# BDC LIBRARY

## New Paper Clipping

## A.Y. 2023-2024

# पाटणमध्ये आंतरराष्ट्रीय व्याघ्रदिनानिमित्त रॅली

## व्याघ्र जनजागृतीपर विविध उपक्रम

▲ पाटण, दि. ३१ : वाघ हा निसर्ग परिसंस्थेतील आणि अन्नसाखळीतील सर्वात महत्त्वाचा घटक आहे. वाघ असेल तर जंगल टिकेल आणि जंगल टिकेल तर वाघ वसेल या विचाराला धरून आंतराष्ट्रीय व्याघ्र दिनानिमित्त सह्याद्री व्याघ्र राखीव अंतर्गत असणाऱ्या वन्यजीव पाटण वनपरिक्षेत्रात भव्य रॅली काढण्यात आली.

बफर भागातील बाळासाहेब देसाई महाविद्यालय उपसंचालक उत्तम सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहाय्यक वनसंरक्षक संदीप गवारे यांच्या प्रमुख उपस्थितीत, वनक्षेत्रपाल शिशुपाल पवार आणि वन्यजीव पाटणचा सर्व स्टाफ यांनी वन्यजीव संवर्धन आणि व्याघ्र जनजागृतीपर अनेक उपक्रम महाविद्यालयात राबविले. विद्यार्थ्यांची वाघाविषयी जनजागृती रॅली काढणे, निसर्ग जनजागृती, पर्यावरण अभ्यासक सुनील करकरे यांचे व्याख्यान, वाघ आणि त्याचा अधिवास, राहणीमान वैशिष्ट्ये इत्यादीबाबत चित्रफित दाखवणे, विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिक आणि प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

एकूण ६८० विद्यार्थ्यांनी रॅलीत उत्स्फूर्त सहभाग घेतला होता. यावेळी वाघ वाचवा, जंगल वाचवा, एकच ध्यास सह्याद्री वन्यजीवचा जपू अधिवास, अशा अनेक घोषणा देत विद्यार्थ्यांची बाळासाहेब देसाई महाविद्यालय ते पाटण नवीन बसस्थानक अशी रॅली काढण्यात आली. यावेळी सुनील करकरे, संदीप गवारे, शिशुपाल पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास कोयना शि... संस्थेचे संचालक ... पाटणकर, प्राचार्य डॉ. एस. ... पवार, सर्व कॉलेज स्टाफ, ... मार्गदर्शक अनिल बोधे, ... फुटाणे, सुशांत शिंदे, ... म्हासुर्णेकर, पाटण वन्यजीवचे ... वनरक्षक, वनपाल, वनमजूर आ... उपस्थित होते.



रॅलीप्रसंगी अधिकारी.